# 2 जानेवारी 2022 चालू घडामोडी PDF Download

**चालू घडामोडी (2 जानेवारी 2022)**




शेतीमालास किफायतशीर किंमत मिळण्यासाठी विद्यापीठाकडून विशेष सॉफ्टवेअरची निर्मिती :

- **शेतकऱ्यांच्या शेतीमालाला आधारभूत किंमत मिळावी आणि त्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला** मिळावा, यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून विशेष सॉफ्टवेअरची निर्मिती करण्यात आली.
- तर त्याला **भारत सरकारकडून स्वामित्व हक्क (पेटंट) प्राप्त** झाले आहे. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी ही माहिती दिली ‘ॲन इंटिलीजेंट सिस्टीम अँड ए मेथड फॉर सिस्टिमेटिक डिस्ट्रिब्युशन ऑफ

ॲग्रिकल्चर गुड्स ' असे या सॉफ्टवेअरचे नाव असून त्याला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून स्वामित्व हक्क मिळाले आहे.

- तसेच **कोणत्या वेळी कोणते पीक घ्यावे, त्याचबरोबर विविध शेती मालाला कोणत्या कालावधीमध्ये भाव प्राप्त होतो** तसेच कोणत्या विभागांमध्ये त्या पिकाला दर मिळतो हे विद्यापीठाकडून तयार करण्यात आलेले सॉफ्टवेअर मार्गदर्शन करू शकते.
- तसेच त्या माध्यमातून जिल्हानिहाय विक्री व वितरण व्यवस्था देखील सॉफ्टवेअरच्या माध्यमातून योग्य पद्धतीने करता येणार आहे.
- जेणेकरून शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव मिळून त्यांचा उत्पन्न वाढण्यासाठी या विशेष सॉफ्टवेअरची निर्मिती करण्यात आली आहे.

**Must Read (नक्की वाचा):**

चालू घडामोडी (1 जानेवारी 2022)

6000 संस्थांच्या परदेशी देणग्या बंद :

- जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, आयआयटी, दिल्ली, इंडियन मेडिकल असोसिएशन, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय यांच्यासह देशातील 6000 संस्थांचा परदेशी देणगी परवाना शनिवारी रद्द झाला.
- तर यापैकी काही संस्थांनी आपल्या **परदेशी देणगी नियमन (एफसीआरए)** परवान्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज केले नसावेत किंवा केंद्रीय गृहमंत्रालयाने त्यांचे अर्ज फेटाळले तरी असावेत, अशी शक्यता सरकारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.
- 'एफसीआरए' कायद्यानुसार नोंदणीकृत अशासकीय संस्था (एनजीओ) आणि त्यांच्या सहकारी संस्थांचे प्रकल्प आणि कार्यक्रमांचे नियमन केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने करण्यात येते.
- परदेशी देणग्यांसाठी कोणत्याही अशासकीय **संस्था-संघटनांना 'एफसीआरए'नोंदणी करणे अनिवार्य** आहे.

पीएम किसान योजनेचा दहावा हप्ता जाहीर :

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पीएम किसान सन्मान निधीचा दहावा हप्ता जारी केला आहे.
- पीएम किसान सन्मान निधीच्या दहाव्या हप्त्यात सरकारने दहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात **20 हजार कोटी रुपये हस्तांतरित** केले आहेत.
- पीएम किसान योजनेंतर्गत, सरकारकडून लाभार्थी शेतकऱ्यांना एका आर्थिक वर्षात सहा हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते.
- **4 महिन्यांच्या अंतराने 2 हजार रुपयांचे तीन हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात** जमा केले जातात.

## 2 जानेवारी 2022 चालू घडामोडी PDF Download

ऑनलाइन खाद्यपदार्थांच्या किमतीत ‘जीएसटी’ची भर :

- केंद्र सरकारने नव्या वर्षाच्या आरंभालाच वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) वसुलीचे जाळे विस्तारले.
- स्विगी आणि झोमॅटोसारख्या **ऑनलाइन खाद्यपदार्थ पुरवठादारांना** शनिवार, 1 जानेवारीपासून संबंधित खाद्यपदार्थ विक्रेत्यांना
- पाच टक्के दराने जीएसटी आकारून ती सरकारच्या तिजोरीत जमा करणे अनिवार्य करण्यात आले आहे.
- तसेच याच धर्तीवर शनिवारपासून, **उबर, ओलासारख्या टॅक्सी सेवा पुरवठादारांनाही** त्यांनी केलेल्या दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या बुकिंगवर पाच टक्के दराने जीएसटी आकारून ती सरकारजमा करण्यास सांगण्यात आले आहे.
- 2022 मधील जीएसटी आकारणीसाठी अनेक बदल करण्यात आले आहेत. सध्या जीएसटीअंतर्गत नोंदणी केलेली उपाहारगृहे या कराची आकारणी करून तो सरकारला देत आहेत.

दिनविशेष:

- **सन 1881** मध्ये लोकमान्य टिळकांनी पुणे येथे मराठा नियतकालिक सुरु केले.
- **2 डिसेंबर 1885** मध्ये पुणे येथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरु झाले.
- मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना **2 जानेवारी सन 1936** मध्ये झाली.
- राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी **सन 1954** मध्ये भारतरत्न पुरस्काराची स्थापना केली होती.
- **सन 1985** मध्ये पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या शताब्दी निमित्ताने टपाल तिकिटाचे प्रकाशन करण्यात आले.

# Arogya Vibhag Exam Information

| क्रं | परीक्षेचे नाव | टेस्ट लिंक |
|---|---|---|
| 1 | आरोग्य विभाग भरती परीक्षा संपूर्ण माहिती | माहिती पहा |
| | आरोग्य विभाग भरती परीक्षा जाहिरात डाउनलोड करा | डाउनलोड करा |
| 2 | आरोग्य विभाग भरती परीक्षा अभ्यासक्रम PDF डाउनलोड | डाउनलोड करा |
| 3 | **आरोग्य विभाग ऑनलाइन टेस्ट सिरिज** | टेस्ट_सोडवा |
| 4 | आरोग्य विभाग भरती परीक्षा प्रश्नपत्रिका डाउनलोड करा | डाउनलोड करा |

| क्रं | परीक्षेचे नाव | टेस्ट लिंक |
|---|---|---|
| 5 | आरोग्य विभाग भरती परीक्षा पात्रता | माहिती पहा |
| 6 | आरोग्य विभाग भरती नोट्स | माहिती पहा |
| 7 | आरोग्य विभाग भरती परीक्षा पुस्तक यादी | डाउनलोड करा |
| 8 | आरोग्य विभाग भरती परीक्षा अभ्यास नियोजन | डाउनलोड करा |
| 9 | आरोग्य विभाग भरती परीक्षा प्रश्न विडियो पहा | विडियो पहा |
| 10 | आरोग्य विभाग भरती परीक्षा | डाउनलोड करा |
| 11 | आरोग्य विभाग ऑनलाइन टेस्ट सिरिज | टेस्ट_सिरिज सोडवा |



OOAcademy , Pune
MPSC COMBINE-B
PSI/STI/ASO
पूर्व परीक्षा परिपूर्ण तयारीसाठी
पहिल्या बॅचच्या भरघोष प्रतिसादानंतर टेस्ट सिरीज
बॅच नं. 2
TEST SERIES-2.0
Offline - Online Test
6 जानेवारी 2022 पासून सुरु
दुपारी ३. वा.
पहिली टेस्ट सर्वासाठी मोफत
टेस्टची वैशिष्ट्ये
एकूण 13 टेस्ट असतील.
6 विषयावर आधारित टेस्ट.
7 सामान्य क्षमता चाचणी टेस्ट
टेस्ट सोडविल्यानंतर त्याच दिवशी टेस्ट विश्लेषण
प्रवेश सुरु
पूर्व नाव नोंदणी आवश्यक
पत्ता : 847, पहिला मजला , भालचंद्र हाईटस, पंजाब स्ट्रीटच्या वर
खाऊ गल्ली , ज्ञानप्रबोधिनी जवळ , सदाशिव पेठ , पुणे - 411030
7798348242 / 8010457760